# घनकचरा व्यवस्थापन कार्यालय, पुणे महानगरपालिका

## गणेशोत्सव २०२१

सालाबादप्रमाणे सन २०२१ मधील सार्वजनिक गणेशोत्सव दिनांक १०/०९/२०२१ ते १९/०९/२०२१ या कालावधीत साजरा करण्यात येणार असून सध्या शहरातील कोविड-१९ आजाराची पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व पुणेकर नागरिकांना मा.महापौर व मा.महापालिका आयुक्त यांनी खालीलप्रमाणे आवाहन केले आहे.

- घरच्या घरी गणेशमूर्तीचे विसर्जन करण्याकरीता पुणे महानगरपालिकेमार्फत एकूण २०० मे.टन अमोनियम बायकार्बोनेट सर्व क्षेत्रिय कार्यालयांना मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- शहरातील एकूण २४७ मूर्तीदान संकलन केंद्राच्या ठिकाणी, क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सर्व आरोग्य कोठ्यांच्या ठिकाणी व गणेश मंडळाच्या ठिकाणी सर्व नागरीकांस अमोनियम बायकार्बोनेट पावडरचे मोफत वाटप करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयामधील नागरिकांना सरासरी १२-१३ टन अमोनियम बायकार्बोनेट वितरीत करण्यात आले आहे.
- सन २०२१ साठीच्या गणेश विसर्जनासाठी १५ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण २४७ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्रे उभारण्यात आली आहेत. तसेच ज्या नागरिकांस घरच्या घरी मूर्ती विसर्जन करणे शक्य नाही अशा नागरिकांसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत एकूण ६० मूर्ती विसर्जन रथ (फिरते हौद), तसेच क्षेत्रिय कार्यालय स्तरावर काही मूर्ती विसर्जन रथांची (फिरते हौद), व्यवस्था करून देण्यात आली आहे.
- सन २०२० गणेशोत्सव काळात पुणे महानगरपालिका स्वच्छ सहकारी संस्थेमार्फत एकूण ८७,४४२ किलो निर्माल्य गोळा करण्यात आले होते. या वर्षी देखील सर्व गणेशमूर्ती संकलन केंद्राच्या ठिकाणी निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. निर्माल्याचे खत निर्माण केले जाते व हे खत पुढे महानगरपालिकेच्या उद्यानांसाठी वापरले जाते व शेतक-यांना मोफत दिले जाते. यामधील फुलांच्या निर्माल्यापासून पर्यावरणपूरक उदबत्ती कमिन्स इंडिया कंपनीच्या सौजन्याने तयार केली जाते.
- सन २०२० मध्ये फिरत्या हौदांमध्ये ८२५५१ मूर्ती विसर्जन व संकलन केंद्रावर ७९७७७ मूर्ती संकलन असे एकूण १६२३२८ गणेश विसर्जन झाले होते.
- नागरिकांनी निर्माल्याचे वेगळे संकलन करून ठेवावे. हे सर्व निर्माल्य आपल्या दारातून गोळा करायला येणा-या कचरा वेचकांमार्फत अथवा घंटागाडीमार्फत ओला सुका कचरा व्यतिरिक्त वेगळ्या पोत्यांमधून दि.१२ सप्टेंबर २०२१, १५ सप्टेंबर २०२१ आणि दिनांक २० सप्टेंबर २०२१ रोजी घेतले जाईल.
- कोणीही निर्माल्य नदीपात्र, तलावात टाकू नये असे आवाहन मा.महापौर व मा.महापालिका आयुक्त यांनी सर्व पुणेकर नागरिकांना केले आहे.
- निर्माल्यामध्ये केवळ हार, पाने, फुले एवढ्याच गोष्टींचा समावेश असावा. त्यामध्ये प्लास्टिक, थर्माकॉल, कापडी वस्तू किंवा तसबिरी, मुर्त्या किंवा त्यांचे अवशेष तसेच कुठलेही खाद्यपदार्थ टाकू नयेत. हे प्रासादिक निर्माल्य एकत्र करून त्याचे खत बनवून शेतक-यांना देण्यात येते, म्हणूनच या प्रासादिक निर्माल्याचे पावित्र्य भंग पावेल अशा कुठल्याही वस्तू किंवा इतर कचरा निर्माल्यात टाकू नये.
- क्षेत्रिय कार्यालयांमार्फत संकलित केलेल्या गणेश मूर्तीचे विसर्जन करणेची व्यवस्था वाघोली येथील खाणीमध्ये दोन पाळयांमध्ये आवश्यक सेवक व पर्यवेक्षकीय अधिकारी नेमून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात आली आहे.